# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### जळगांव तसेच लातूर जिल्हयातील जिल्हा परिषद शाळेतील मुख्याध्यापकांची व शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१) १९९९१ (१०-०८-२०१५). श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्हा परिषदेच्या ५०० पैकी १४५ शाळांमध्ये ग्रेडेड मुख्याध्यापकांची पदे दोन वर्षापासून रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच लातूर जिल्हयातील जिल्हा परिषद लातूर अंतर्गतच्या जवळपास १८१ प्राथमिक व माध्यमिक शाळेत इंग्रजी व गणित विषयांचे शिक्षक नसल्याने या विषयाच्या ज्ञानापासून विद्यार्थी वंचीत राहत असल्यामुळे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे दिनांक १८ मार्च, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरची पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदरची रिक्त पदे त्वरीत भरण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास, साधारणत: कैंव्हापर्यंत उक्त पदे भरणे अपेक्षित आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०९-२०१६) :** (१), (२) व (३) हे अशत: खरे आहे. सेवानिवृत्ती, पदोन्नती व निधन इत्यादी कारणांमुळे जळगाव व लातूर जिल्हा परिषदेतील मुख्याध्यापक व शिक्षक पद रिक्त आहेत. सदर पदांबाबत रिट याचिका क्र. ९०२६/१४ मधील आदेशान्वये संचमान्यतेबाबत “जैसे थे” परिस्थिती ठेवण्याबाबत मा. न्यायालयाचे आदेश होते. तथापि मा.न्यायालयाने दि. १२.८.२०१५ च्या निर्णयान्वये सदर आदेश उठविण्यात आले असून संचमान्यता व त्यानुषंगाने समयोजनाची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी आलेला कलश ब्रँड**
**नावाच्या तांदूळाची गैरमार्गाने होत असलेली विक्री**

**(२) २३४५९ (३१-०७-२०१५). डॉ.अशोक उईके (राळेगाव), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी आलेला कलश ब्रँड नावाचा तांदूळ खुल्या बाजारात विक्री करताना पोलिसांमार्फत पकडण्यात आल्याचे दिनांक ३१ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, भविष्यात विद्यार्थ्यांसाठी आलेला धान्यसाठा असा गैरमार्गाने खुल्या बाजारात जाणार नाही याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१९-०९-२०१६) :**(१), (२) व (३) सदर प्रकरणी समिती स्थापन करुन चौकशी करण्यात आली आहे. शालेय पोषण आहार योजनेंतर्गत भारतीय अन्न महामंडळाकडून उचल केलेला तांदूळ शाळांमध्ये प्राप्त झाला आहे. असे चौकशीत आढळून आले आहे. सदर बाब न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ज्या संस्थांचे एकच महाविद्यालय असून एकच रिक्त पद सरळ सेवेने भरायचे आहे**
**अश्या संस्थाना रिक्त पदे भरण्याकरिता ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत**

**(३) २८९२० (२०-०१-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक २ जून, २०१५ च्या शासन निर्णयानुसार असलेली अट रद्द करून ज्या संस्थांचे एकच महाविद्यालय आहे व तेथे एकच रिक्त पद सरळसेवेने भरायचे आहे अशा संस्थाना रिक्त पदे भरण्याकरिता ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत स्थानिक विधानसभा सदस्य यांनी दिनांक १४ ऑक्टोबर, २०१५ रोजी पत्र लिहून मागणी केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२७-०९-२०१६) : (**१) होय.
(२) व (३) शासन निर्णय दिनांक ३.६.२०१५ हा वित्त विभागाचा असल्याने, स्थानिक विधानसभा सदस्य यांच्या दिनांक १४.१०.२०१५ च्या निवेदनास अनुसरून, सदर प्रकरण वित्त विभागास फेरविचारार्थ सादर करण्यात आले आहे.

---

**मौजे चांधई (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील राजमाता जिजाऊ मुलींची सैनिकी शाळेंच्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-याच्या थकित वेतनाबाबत**

**(४) २९५८७ (२१-०१-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे चांधई (ता.चिखली, जि बुलढाणा) येथील राजमाता जिजाऊ मुलींची सैनिकी शाळेंच्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-याचे २००८- ते २०१२ या कालावधीतील वेतन थकल्याने प्राचार्य यांनी वेळोवेळी शिक्षणाधिकारी बुलढाणा यांना निवेदन दिले असल्याचे माहे आक्टोबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन देण्यासंदर्भात शासनाने काय कार्यवाही केली आहे वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (३०-०८-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) शासन निर्णय क्र. संकीर्ण-२४१५/(३४/१५) अर्थसंकल्प, दि. २४.६.२०१५ अन्वये मा. शिक्षण आयुक्त, पुणे यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठित करण्यात आलेली आहे. सदर समितीच्या मंजूरीने प्रस्ताव शासनास सादर करणेबाबत शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, पुणे यांना कळविण्यात आले आहे.

---

**कोल्हापूर तसेच हिंगोली जिल्हयात सर्व शिक्षा अभियानांतर्गत विद्यार्थ्यांना गणवेशासाठी निधी मिळूनही गणवेशाचे वाटप केले नसल्याबाबत**

**(५) ३०२७७ (२१-०१-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयात सर्व शिक्षा अभियानांतर्गत विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येणाऱ्या गणवेशासाठी २ कोटी ६९ लाख रुपयांची रक्कम मिळाली नसल्यामुळे विद्यार्थ्यांना गणवेश मिळाले नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) तसेच कोल्हापूर जिल्हयात सर्व शिक्षा अभियानांतर्गत विद्यार्थ्यांना गणवेशासाठी निधी मिळूनही दिनांक १५ ऑगस्ट, २०१५ पर्यंत गणवेशाचे वाटप करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्व शिक्षा अभियानांतर्गत पुरविण्यात येणारे गणवेश विद्यार्थ्यांना तातडीने देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०८-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यातील दुष्काळी भागातील बारावी पर्यतच्या विद्यार्थ्यांना माध्यान्ह भोजन देण्याबाबत

**(६) ३१६२७ (२१-०१-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील दुष्काळी भागातील बारावी पर्यतच्या विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन द्यावे तसेच इतर मागण्यांसाठी लोकप्रतिनिधीनी मा.शिक्षणमंत्री यांचेकडे दिनांक १० सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केलेली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील दुष्काळी भागातील हजारो विद्यार्थ्यांना दुष्काळाला सामोरे जावे लागत असून सदर प्रकरणी निर्णय घेउन त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०८-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) शालेय पोषण आहार योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, खाजगी अनुदानित व अंशत: अनुदानित शाळा तसेच, बालकामगार प्रकल्प येथील इ. १ ली ते ८ वी मध्ये शिकणारे विद्यार्थी योजनेचे लाभार्थी आहेत.

केंद्र शासनाच्या निकषनुसार इ. ९ वी च्या पुढील वर्गातील विद्यार्थी या योजनेसाठी पात्र नाहीत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### नविन शेवा (ता.उरण, जि.रायगड) येथील स्वातंत्र्यवीर सावरकर माध्यमिक शाळेच्या अनुदानाबाबत

**(७) ३१७२० (२१-०१-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नविन शेवा (ता.उरण, जि.रायगड) येथील स्वातंत्र्यवीर सावरकर माध्यमिक शाळा शासनाच्या सर्व्हेमध्ये अनुदानास पात्र ठरलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू शाळेस अनुदान प्राप्त होण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.शालेय शिक्षण मंत्री, यांना दिनांक १३ मार्च, २०१५ रोजी व त्यापूर्वी वारंवार पत्रव्यवहार करुनही अदयापी अनुदान मंजूर करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त शाळेला अनुदान प्राप्त करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०९-२०१६) :** (१), (२) व (३) शसन निर्णय दि. १.३.२०१४ अन्वये सदर शाळा अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेली आहे. विहित निकषानुसार अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या शाळांना अनुदान उपलब्ध करुन देण्यासाठी सकारात्मक कार्यवाही सुरु आहें.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शैक्षणिक वर्ष सुरु होऊन तीन महिन्यांचा काळ लोटूनही शासनस्तरावरुन शालेय पोषण आहाराचा माल वितरित करण्यात आला नसल्याबाबत**

**(८) ३१९७४ (२१-०१-२०१६). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शैक्षणिक वर्ष सुरु होऊन तीन महिन्यांचा काळ लोटूनही शासनस्तरावरुन अद्यापपर्यंत शालेय पोषण आहाराचा माल वितरित करण्याच्या निविदा काढण्यात आल्या नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) येथील अनेक शाळांमधील विद्यार्थी शालेय पोषण आहरापासून वंचित असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या सुमारस निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणेत येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२७-०९-२०१६) :**(१) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत तांदूळ वाहतुक व ग्रामीण भागामध्ये धान्यादी मालाचा पुरवठा करण्यासाठी जिल्हानिहाय निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असून जून, २०१६ पासून नविन पुरवठेदारामार्फत तांदूळाची वाहतुक व ग्रामीण भागात धान्यादी मालाचा पुरवठा करण्यात येत आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील मुले सक्तीच्या शिक्षणापासून वंचित असल्याबाबत**

**(९) ३२५०४ (२१-०१-२०१६). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात बालकांना मोफत आणि सक्तीचा शिक्षण हक्क अधिकार कायदा लागू असला तरी १ कोटी ५५ लाख मुले सक्तीच्या शिक्षणापासून वंचित असल्याची बाब बालहक्क आयोगापुढे नुकत्याच झालेल्या एका सुनावणी दरम्यान माहे ऑगस्ट, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे राज्यात सरकारकडून शिक्षण हक्क अधिकार कायद्याचे उल्लंघन झाले असून यासाठी आयोगाने राज्य सरकार आणि महापालिका शिक्षण विभागाच्या कार्यक्षमतेवर ताशेरे ओढले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत राज्य शासनाने सर्वसाधारण धोरण व उपाययोजना काय ?

**श्री. विनोद तावडे (२६-०८-२०१६) :**(१) नाही.

(२) नाही.

(३) राज्यात ०४ जुलै, २०१५ ते ३१ जानेवारी,२०१६ या कालावधीत वेळोवेळी केलेल्या सर्वेक्षणात ७४,९७१ एवढी शाळाबाह्य बालके आढळून आली असून या सर्वांना नियमित शाळेत दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

---

**शासकीय अनुदानित शाळांची फी ठरविण्यासाठी शालेय शिक्षण सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्याबाबत**

**(१०) ३५००२ (२१-०१-२०१६). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकिय व अनुदानित शाळांतील विद्यार्थ्यांची फी ठरविणार असल्याचा शासनाने माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये निर्णय घेतला असून या शाळांची फी ठरविण्यासाठी शालेय शिक्षण सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीमध्ये पालकांच्या प्रतिनिधींचा समावेश नसून केजीचे वर्ग आणि विनाअनुदानित खाजगी शाळा यांना या निर्णयातून वगळले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त समितीचा अहवाल प्राप्त होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (३०-०८-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत व्यवस्थापन समितीची स्थापना करण्याबाबत**

**(११) ३५७८६ (२१-०१-२०१६). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचा कारभार व्यवस्थित चालावा व शाळेवर ग्रामस्थांसह पालकांचे नियंत्रण राहावे यासाठी प्रत्येक प्राथमिक शाळेत व्यवस्थापन समितीची स्थापना करण्याबाबत शासनान निर्णय घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापही अनेक आदिवासी गावांतील समित्या कागदावरच राहिल्या असून या समित्यांचे हक्क कर्तव्य समितीतील अनेकांना माहिती नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू समितीबाबत योग्य नियोजन करुन त्याची माहिती पालकांना देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-०९-२०१६) :**(१) होय.
(२) हे खरे नाही.
सदर समितीबाबत योग्य नियोजनासाठी समिती सदस्यांना अनिवासी प्रशिक्षण सन २०१४-१५ मध्ये देण्यात आले आहे.
(३) शाळा व्यवस्थापन समितीमध्ये ७५ टक्के सदस्य हे पालकांमधून घेण्यात येतात. समितीच्या बैठकीची कार्यवृत्ते व निर्णय याबाबतचे अभिलेख पालकांना उपलब्ध केले जातात. तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे सक्षमीकरण करण्यासाठी सदस्यांना सन २०१३-१४ पासून तीन दिवसांचे अनिवासी प्रशिक्षण देण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कृषक प्राथमिक शाळा आर्वी, जि.वर्धा या अनुदान पात्र शाळेस तातडीने अनुदान देण्याबाबत**

**(१२) ३६४८५ (२१-०१-२०१६). श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्वी (जि.वर्धा) कृषक प्राथमिक शाळा सन २०१२-१३ पासून अनुदानास पात्र ठरविण्यात आली असून शिक्षण विभाग, वर्धा जिल्हा यांच्याकडून सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात ६० टक्के अनुदान देय राहील अशाप्रकारचे पत्र प्राप्त झाले असल्या बाबतचे निवेदन मा.लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर,२०१५ मध्ये वा त्यासुमारास मा. शालेय शिक्षणमंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी अद्यापपावेतो उक्त शाळेला अनुदान प्राप्त झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने कृषक प्राथ.शाळा,आर्वी या शाळेस तातडीने अनुदान प्राप्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-०९-२०१६) :**(१)होय, शासन निर्णय दि. ३०/११/२०१३ अन्वये सदर शाळा अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेली आहे.
(२) व (३) विहित निकषानुसार अनुदानास पात्र ठरलेल्या शाळांना अनुदान उपलब्ध करुन देण्यासाठी सकारात्मक कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**स्व: शंकराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयाचे लोकार्पण व स्थलांतर होऊनही या रुग्णालयात सोयी सुविधा उपलब्ध नसल्याबाबत**

**(१३) ३७८७७ (२२-१२-२०१५). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्व: शंकराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयाचे लोकार्पण व स्थलांतर होऊनही या रुग्णालयात पिण्याचे पाणी, जैविक कचरा, भस्मिकरण, तसेच उद्द वाहक यासारख्या यंत्रणा नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामे विहित कालावधीत पूर्ण न करणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता व कंत्राटदार यांचेवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, त्यामागची सर्वसाधारण कारणे काय ?

**श्री. विनोद तावडे (०६-१०-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण पूर्व येथील मॉडले इंग्लिश स्कुलमध्ये मधील शिक्षकांवर होत असलेला अन्याय**

**(१४) ३८०३९ (२१-०१-२०१६). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण पूर्व येथील मॉडेल इंग्लिश स्कुलमध्ये शिक्षकांवर अन्याय होत असल्याच्या निषेधार्थ महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषदेच्या वतीने दिनांक ३ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास धरणे आंदोलन करुन याबाबतचे निवेदन जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडे देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनात कोणकोणत्या तक्रारी करण्यात आल्या आहेत,

(३) तसेच, तक्रारीच्या अनुषंगाने सदर शाळा प्रशासनावर शासनाने कोणती कडक कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०१-१०-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद विभागातील ३८ शाळांतील परिक्षार्थी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणा-या दहावीच्या परिक्षेला बसले नसल्याबाबत**

**(१५) ४१४९१ (२५-०५-२०१६). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणा-या दहावीच्या परिक्षेला

औरंगाबाद विभागातील ३८ शाळांमधून एकही परिक्षार्थी बसला नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण मंडळाने दहावी, बारावीच्या परिक्षेचे वेळापत्रक जाहीर करुन महिनाभरावर परिक्षा आली असतांना औरंगाबाद विभागातून एकही अर्ज आला नसल्याची नोंद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी उक्त विभागात शाळा केवळ नोंदणीपुरत्याच आहेत काय याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व तदनुसार, यास जबाबदार असणा-या व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०८-२०१६) :**(१) नाही.

औरंगाबाद विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील एकूण २९ शाळामधून इ. १० वी ला प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे औरंगाबाद विभागीय मंडळाकडे सादर झालेली नाहीत.

(२) अंशत: खरे आहे.

(३) औंरंगाबाद विभागीय मंडळामार्फत चौकशी सुरु आहे. संबंधीत शाळांची मंडळ मान्यता / सांकेतांक क्रमांक रद्द करण्याची कार्यवाही औरंगाबाद विभागीय मंडळामार्फत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्हा परिषदेच्या शालेय पोषण आहारातून तूरीच्या डाळीएवजी अन्य डाळींचा वापर होत असल्याबाबत

**(१६) ४१४९९ (२५-०५-२०१६). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तूरडाळ महाग झाल्याने वाढत्या किंमतीचा फटका शालेय पोषण आहारालाही बसला असून गत चार महिन्यापासून बुलढाणा जिल्हा परिषदेच्या पोषण आहार नियोजन आदेशातून तूरीची डाळ गायब झाल्याची बाब माहे डिसेंबर, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे जिल्हयातील प्राथमिक शाळेतील २ लाख ३० हजार विद्यार्थी तूर डाळीच्या खिचडीपासून वंचित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तूर डाळीऐवजी चवळी, चणा, मूग, मसूर डाळीचा वापर करण्यात येत असल्याने चवीत फरक पडणे तसेच या डाळी बालकांना पचणार की नाही याबाबत शंका निर्माण होत असल्याने योग्य त्या चाचण्या करुन बालकांना पचनास हलक्या अशा डाळीचा वापर करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२७-०९-२०१६) :** (१), (२) व (३) दि. २/२/२०११ च्या शासन निर्णया नुसार संबंधित जिल्ह्याच्या आवश्यतेप्रमाणे योग्य त्या पाककृतीची निवड आठवड्यातील प्रत्येक दिवसासाठी करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखालील समितीस देण्यात आलेले आहेत. यानुसार जिल्हा स्तरावर पाककृती निश्चित करण्यात येते.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांनी सप्टेंबर, २०१५ मध्ये तुरडाळी ऐवजी चवळी व वाटणा च्या पाककृती निश्चित केलेल्या होत्या.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मेहकर (जि.बुलढाणा) जानेफळ तालुक्यातील कळंबेश्वर येथील शिवाजी हायस्कूलचे नाव असलेले पोषण आहारांच्या तांदूळाच्या कट्टे जानेफळ येथील पाणी साठवण तलावाजवळील गोडाऊनमध्ये ठेवल्याबाबत**

**(१७) ४१५१८ (३०-०४-२०१६). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर (जि.बुलढाणा) जानेफळ तालुक्यातील कळंबेश्वर येथील शिवाजी हायस्कूलचे नाव असलेले पोषण आहारांच्या तांदूळाच्या कट्टे जानेफळ येथील पाणी साठवण तलावाजवळील गोडाऊनमध्ये ठेवल्याचे दिनांक २७ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेहकर तालुक्यात पोषण आहार काळया बाजारात विकला जात असल्याचे यावरुन निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच काही शाळांत बोगस पटसंख्या दाखवून विदयार्थांच्या वाटपाचे धान्य शाळेचे कर्मचारी वर्ग लाटत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०८-२०१६) :**(१) व (२) अशा स्वरुपाची बातमी वर्तमानवत्रामध्ये प्रसिध्द झाली होती. तथापी, याबाबत चौकशी केली असता यामध्ये तथ्य आढळून आले नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील जिल्हा परिषदा आणि नगरपालिकांच्या सर्व शाळा डिजिटल करण्याबाबत**

**(१८) ४२३७४ (१६-०५-२०१६). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषदा आणि नगरपालिकांच्या सर्व शाळा डिजिटल करण्याचे शिक्षण

विभागाचे धोरण असले तरी त्याच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेल्या निधीची तरतूदच नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उपक्रमाला शासनाने निधीची तरतूद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०८-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) सर्व शिक्षा अभियानांतर्गतच्या नाविन्यपूर्ण उपक्रमातून सन २०१५-१६ मध्ये निवड करण्यात आलेल्या उपक्रमशिल शाळांसाठी प्रतिशाळा रुपये १७५००/- प्रमाणे २०० शाळांसाठी एकूण रु. १२,०७,५०,०००/- इतकी तरतूद वितिरीत करण्यात आली आहे.

---

**राज्यात शासनाच्या वतीने पोषण आहार योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या मुगडाळीचे वरण खाण्यास विद्यार्थी नापसंती दर्शवित असल्याबाबत**

**(१९) ४२७४६ (१२-०५-२०१६). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागील अनेक महिन्यांत ग्रामीण भागातील शाळांना तूरडाळीऐवजी मूगडाळ देण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या शासनाच्या वतीने पोषण आहार योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या आहाराचे वेळापत्रक ठरविण्यात आले असून त्यानुसार त्यांना कडधान्य, मुगडाळ देण्यात येते परंतू विद्यार्थी मुगडाळीचे वरण खाण्यास नापसंती देत आहेत, हे लक्षात घेता शासन यासंदर्भात कोणती कार्यवाही करणार वा करीत आहे ,

(३) नसल्यास, यामागील कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०८-२०१६) :** (१), (२) व (३) दि २-२-२०११ च्या शासन निर्णयानुसार संबंधित जिल्हयाच्या आवश्यकतेप्रमाणे योग्य त्या पाककृतीची निवड आठवड्यातील प्रत्येक दिवसासाठी करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखालील समितीस देण्यात आलेले आहेत. यानुसार जिल्हा स्तरावर पाककृती निश्चित करण्यात येते.एखादी पाकृती विध्यार्थ्यांना आवडली नसल्यास किंवा विध्यार्थी चवीने ती खात नसल्यास त्या ऐवजी अन्य पाककृतीची निवड जिल्हा स्तरावरुन करता येते.

---

**राज्यात सेमी इंग्रजी माध्यमातील शाळांमध्ये गणित व विज्ञानाचे**
**पुस्तक शास्त्रीय इंग्रजी भाषेत उपलब्ध होण्याबाबत**

**(२०) ४३११५ (१६-०५-२०१६). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पहिलीपासून सेमी इंग्रजी माध्यमातील शाळा सुरु करण्यास दिनांक १९ जून, २०१३ रोजी शासनाने परवानगी दिल्यानंतर सन २०१४-१५ व सन २०१५-१६ या दोन वर्षात किती सेमी इंग्रजी शिकविणाऱ्या शाळांची निर्मिती झाली आहे,

(२) असल्यास, सदर शाळांमधील विद्यार्थ्यांना गणित व विज्ञानाचे इंग्रजी माध्यमासाठी तयार केलेले पुस्तक आणि अभ्यासक्रम यामध्ये कमालीची तफावत असल्यामुळे तसेच पुस्तकातील भाषेतील अशास्त्रीय तफावत यामुळे विद्यार्थ्यांना समजण्यास अडचण येत असल्याने सदर विषय विद्यार्थी टाळू लागले असल्याची घटनाही वारंवार वाढत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांना सहज समजू शकेल अशी शास्त्रीय इंग्रजी भाषेतील पुस्तके उपलब्ध व्हावीत यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०८-२०१६) :** (१) सन २०१४-१५ व सन २०१५-१६ या दोन वर्षात ६३१ शाळांना परवाणगी देण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगाव (जि.नाशिक) येथील उर्दू भाषेतील विद्यार्थ्यांकरिता टी.ई.टी**
**परिक्षेचा पेपर उर्दू भाषेत देण्याची सवलत मिळण्याबाबत**

**(२१) ४३४९६ (१६-०५-२०१६). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.नाशिक) येथील उर्दु भाषेतील विद्यार्थ्यांकरिता टी.ई.टी परिक्षेचा पेपर उर्दू भाषेत देण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ जानेवारी, २०१६ रोजी मा.आयुक्त, परिक्षा परिक्षण विभाग (शिक्षण) यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१९-०९-२०१६) :**(१) होय.

(२) शिक्षक पात्रता परिक्षेसाठी उर्दू माध्यमाच्या परिक्षार्थींना हस्तलिखित स्कॅनिंग केलेल्या प्रश्नपत्रिकेसोबत डीटीपी स्वरुपात प्रश्नपत्रिका पुरविण्याबाबतच्या सूचना दि.५ मे, २०१५ च्या पत्रान्वये महारष्ट राज्य परिक्षा परिषदेस दिलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोले तालुक्यात (जि.अहमदनगर) आलेल्या उसतोड व वीटभट्टी मजूरांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय करण्याबाबत**

**(२२) ४३७७४ (१६-०५-२०१६). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोले तालुक्यात (जि.अहमदनगर) सुमारे ४५ विटभट्ट्या असून तेथे मोठ्या प्रमाणात मजूर आले असून त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच कन्नड तालुक्यातून (जि.औरंगाबाद) ऊसतोड कामगार अकोले येथे आले असुन त्याही मुलांच्या शिक्षणाची सोय केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार विटभट्ट्यांसाठी आणि ऊस तोड करण्यासाठी आलेल्या मजुरांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०८-२०१६) :**(१), (२), (३) व (४) नाही. विटभट्टी परिसर व साखर कारखाना परिसर येथे करण्यात आलेल्या सर्वेक्षणात विटभट्टी कामगारांची ३३ मुले व ऊसतोड कामगारांची ८९ मुले आढळून आली. या विटभट्टी कामगारांच्या ३३ मुलांना व उसतोड कामगारांच्या ८९ मुलांना नजीकच्या शाळेत दाखल केले असून त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले आहे. त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वन हक्क कायद्याची अंमलबजावणी करणेबाबत**

**(२३) ४४५२७ (०७-०५-२०१५). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वन हक्क कायदा लागू झालेला असताना महापालिका क्षेत्रातील आदिवासी व इतर अनुसूचित जमातीतील वस्ती-पड्यांना कोणत्याही मूलभूत नागरी सुविधा पुरविल्या गेल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत ठाणे येथील वन हक समितीने वेळोवेळी मागणी करुनही महापालिका प्रशासनाकडून ठोस कारवाई केली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास याबाबत शासन योग्य चौकशी करणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०७-११-२०१६) :** (१) हे खरे नाही.

आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय, क्र.वहका-२०१५/प्र.क्र.६१/का-१४, दि.०८ सप्टेंबर, २०१५ अन्वये अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वनविनासी (वनहक्काची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम २००८ व सुधारणा नियम २०१२ ची नगर परिषद/नगर पालिका व महानगर पालिका क्षेत्रात अंमलबजावणी करणेबाबत जिल्हाधिका-यांना निर्देश देण्यात आले आहेत.

(२) नाही.

मागणी केल्याप्रमाणे कामांचे प्रस्ताव तयार करण्यात आले असून सक्षम प्रधिकरणाच्या मंजुरीनंतर सदर कामे करणेत येतील असे जिल्हाधिकारी, ठाणे यांनी कळविले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शालेय पोषण आहार शिजविण्यासाठी राज्यातील शाळेंना गॅस सिलेंडर वापरण्याकरीता देण्यात आलेले निर्देश

**(२४) ४५२१६ (१२-०५-२०१६). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय पोषण आहार शिजविण्यासाठी राज्यातील प्रत्येक शाळेने गॅस सिलिंडर वापरण्याचे निर्देश शासनाने दिले असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आहार शिजविण्यासाठी शाळांना अनुदानित सिलिंडर देणे बंद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गॅस सिलेंडरची खरेदी लोकसहभागातून करावयाची आहे काय, तसेच यासाठी शासनाकडून निधी उपलब्ध करुन देण्याचे विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त गॅस सिलिंडर अनुदानित दरात देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०९-२०१६) :** (१) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत सर्व शाळांमध्ये गॅसचा वापर करून आहार शिजविला जाईल, याबाबत कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(२), (३) व (४) होय. शालेय पोषण आहार योजनेंतर्गत ग्रामीण भागातील शाळांमध्ये आहार शिजविण्यासाठी गॅस कनेक्शन उपलब्ध करुन देण्याबाबत विचारविनिमय सुरु आहे. तथापि, स्वयंपाकासाठी लागणारा गॅस सिलेंडर संबंधित अन्न शिजविणाऱ्या यंत्रणांनीच खरेदी करणे आवश्यक आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ग्रामीण भागात एक शिक्षकी शाळा असल्याचे आढळून आल्याबाबत**

**(२५) ४५५३७ (१६-०५-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाकडून दरवर्षी माहिती संकलन करण्याचे काम यु-डायसच्या माध्यमातून केले जाते त्यानुसार राज्यातील ग्रामीण भागात ३५३४ एक शिक्षकी शाळा असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळांमध्ये काही कारणास्तव शिक्षक गैरहजर राहिल्यास त्यादिवशी संपूर्ण शाळाच बंद रहात असल्याने हजारो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०८-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दहावीच्या वर्गातील विद्यार्थ्यांचा भविष्यात उच्च शिक्षणाच्या क्षेत्रातील कल तपासण्याकरीता एनजीओच्या मार्फत चाचणी घेण्याबाबत**

**(२६) ४५५६७ (१२-०५-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दहावीच्या विद्यार्थ्यांची घेण्यात येणारी चाचणी एनजीओच्या मार्फत केली जाणार असून त्यामुळे राज्यात शिकत असलेल्या तब्बल १६ लाख दहावीच्या विद्यार्थ्यांच्या तसेच २५ हजार शाळांच्या माहितीचा डाटा शिक्षण विभागाकडून एनजीओकडे जाणार असल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दहावीच्या वर्गातील विद्यार्थ्यांना भविष्यात उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात कोणता कल आहे हे चाचण्यातुन तपासले जाणार असून यात मानसशास्त्रीय कसोट्याही तपासल्या जाणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विद्यार्थ्यांची व शाळांची माहिती सुरक्षित ठेवण्यासाठी शासनाने काही उपाययोजना केल्या आहेत काय वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०८-२०१६) :** (१) हे खरे नाही. सदर चाचणी संपूर्ण राज्यभर राज्यमंडळामार्फत व फक्त २०० शाळांमध्ये एनजीओ मार्फत घेतलेली आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सदर माहिती राज्यमंडळाकडे सुरक्षित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अतिदुर्गम भागातील शिक्षकांच्या रिक्त असलेल्या जागांबाबत**

**(२७) ४५९६६ (२५-०५-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील काही शाळांमध्ये शिक्षकांची बदली झाल्याने किंवा समायोजन समुपदेशन पद्धतीने होत असल्याने अतिदुर्गम भागातील रिक्त असलेल्या शिक्षकांच्या जागा या रिक्तच आहेत हे खरे आहे काय,
(२) तसेच प्रथम नियुक्ती मिळणाऱ्या शिक्षकांना समुपदेशन बंद केले तर अतिदुर्गम भागातील शाळांना शिक्षक देता येऊ शकतो हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (२९-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्हातील उल्हासनगर विधानसभा क्षेत्रासाठी क्रीडा संकुलाची समिती गठीत केली नसल्याबाबत**

**(२८) ४६४५५ (०६-०५-२०१६). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या धोरणानुसार प्रत्येक तालुक्यासाठी तालुका क्रीडा संकुलाची निर्मिती करून समितीची पुर्नरचना करण्याचा शासन आदेश निर्गमित केल्यानुसार ठाणे जिल्हातील उल्हासनगर विधानसभा क्षेत्रासाठी अद्यापही समिती गठीत केली नाही किंवा समिती गठीत करणेसाठी उल्हासनगर विधानसभा निर्वाचन क्षेत्राच्या निर्वाचित सदस्यांचे अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली आहे काय,
(२) असल्यास, आता पर्यंत किती बैठकींचे आयोजन करण्यात आले आहे व त्यामध्ये कोणता निर्णय घेण्यात आला आहे,
(३) नसल्यास, समिती गठीत करणेसाठी शासनाकडून कोणते प्रयत्न केले आहेत वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०९-२०१६) :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) दिनांक २९.०२.२०१६ अन्वये तालुका क्रीडा संकुल समिती गठीत करणेबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून त्यानुसार उल्हासनगर तालुका क्रीडा संकुलासाठी समिती गठीत करण्याबाबतची कार्यवाही सूरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील शिक्षकांच्या रिक्त जागा केंद्रीय निवड परिक्षामार्फत (सीईटीने) भरण्याबाबत**

**(२९) ४६८१८ (१२-०५-२०१६). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील खाजगी शाळांमधील सर्व शिक्षकांच्या रिक्त जागा भरतीपूर्वी केंद्रीय निवड परिक्षामार्फत सीईटीने भरण्यात येणार असल्याने प्राथमिक माध्यमिक शाळांतील शिक्षकांची नियुक्ती व नव्याने पदभरती करण्यात येऊ नये असे आदेश उच्च माध्यमिक संचालकांनी विभागीय शिक्षण उपसंचालकांना दिला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यार्थ्यांचे नुकसान व शिक्षकांचे शोषण करणारी सीईटीची पध्दत रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१९-०९-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.
तथापि सदर बंदी दिनांक ०६/०२/२०१६ च्या पत्रान्वये उठविण्यात आली आहे.
(२) अशा परिक्षा पध्दतीमुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नसून शिक्षणाचा दर्जा वाढविण्याच्या दृष्टीने उच्च गुणवत्ताधारक शिक्षकांच्या निवडीसाठी सदर परिक्षा पध्दती उपयुक्त ठरणार आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे काष्टी (ता.श्रीगांदा, जि.अहमदनगर) येथील जिल्हापरिषदेच्या शाळेत मुख्याध्यापकासह दोन शिक्षकांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(३०) ४७०३९ (१६-०५-२०१६). श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे काष्टी (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथील जिल्हा परिषद शाळेतील मुख्याध्यापक आणि दोन शिक्षकांची पदे रिक्त असल्याने विद्यार्थ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शिक्षकांची पदे रिक्त असल्याने ग्रामस्थ तसेच पालकांकडून शाळा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर पदे भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात यंत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०९-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे. जिल्हा परिषद अहमदनगर अंतर्गत श्रीगोंदा तालुक्यातील मौजे काष्टी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे मुख्याध्यापकाचे १ पद मंजूर असून सद्यस्थितीत मुख्याध्यापकाचे पद रिक्त आहे व प्राथमिक शिक्षकांचे १२ पदे मंजूर असून १ पद रिक्त आहे.
(२) नाही.
(३) नाही.
(४) सन २०१५-१६ ची संचमान्यता अंतिम झाल्यानंतर सदर पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शालेय पोषण आहारात केळीचा व संत्र्याचा समावेश करण्याबाबत**

**(३१) ४७९३५ (१२-०५-२०१६). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव शहरात माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान एका आयोजित कार्यक्रमात मा.मुख्यमंत्र्यांनी केळीचा शालेय पोषण आहारात समावेश करण्याची घोषणा केली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच शालेय पोषण आहरात संत्र्याचा समावेश करण्याची घोषणा मा. शालेय शिक्षण मंत्री यांनी माहे डिसेंबर, २०१५ वा त्या दरम्यान विधीमंडळ आवारात संत्रा स्टॉल भेटी दरम्यान केली होती हे ही खरे काय,
(३) असल्यास, सदर घोषणांची अंमलबजावणी केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे,
(४) उक्त घोषणांनुसार केळीचा व संत्र्याचा शालेय पोषण आहारात समावेशाबाबतचा शासन आदेश किंवा परिपत्रक जारी करण्यात आले आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. विनोद तावडे (२६-०८-२०१६) :**(१), (२), (३) व (४) शालेय पोषण आहार योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राबविण्यात येते. योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या आहारामध्ये फळांचा समावेश करण्याबाबतची विनंती केंद्र शासनाकडे झालेल्या प्रकल्प मान्यता मंडळाच्या बैठकीमध्ये केंद्र शासनास केली होती. तथापी, केंद्र शासनाने यासाठी निधी उपलब्ध करुन दिलेला नाह.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात कायम विनाअनुदानित शासनाच्या निर्णयामुळे सन २००१ पासून प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षकांना अनुदान मिळाले नसल्याबाबत

**(३२) ४७९८२ (१२-०५-२०१६). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यात कायम विनाअनुदानित शासनाच्या निर्णयामुळे (सन २००१) १५ वर्षापासुन प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षकांना अनुदान मिळाले नसल्याने त्यांना वेतन कमी मिळते त्यामुळे अनेक शिक्षकांना आर्थिक अडचणी सहन कराव्या लागत असल्याचे शिक्षक व शिक्षकेत्तर संघटनांनी मा.शिक्षण मंत्री यांना वारंवार निवेदनाद्वारे निदर्शनास आणून दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सन २०१० पासून शाळेतील विद्यार्थी संख्या निश्चित करुन त्यात पात्र असलेल्या शिक्षकांनाही अद्याप अनुदान न मिळण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, शासनाने सन २००१ पासून लागू केलेल्या विना अनुदानित धोरणामुळे १५ वर्षे झाली तरी शाळेतील शिक्षकांना अनुदान मंजूर न करण्याची कारणे काय आहेत,

(४) कायम विनाअनुदानित तत्वावरील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना तातडीने अनुदान अदा करण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०९-२०१६) :**(१), (२), (३) व (४) अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या शाळांना वेतन अनुदान उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धुळे जिल्हा रुग्णालयात जळीत कक्ष स्थापन करण्याबाबत

**(३३) ४८६०५ (११-०५-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हा रुग्णालयातील जळीत कक्ष केंद्र व राज्यशासन यांच्यातील सांमजस्य करार रखडल्याने हा प्रकल्प मार्गी लागण्यास अडथळे येत असल्याचे माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशासन या प्रकल्पाला मार्गी लावण्यासाठी कोणती उपययोजना करीत आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१९-०९-२०१६) :**(१) व (२) केंद्र शासनाच्या १२ व्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत National Programme for prevention & Management of Burn Injuries (NPPMBI) या कार्यक्रमांतर्गत शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये Burn Units स्थापन

करण्याबाबतच्या प्रस्तावास नियोजन विभागाने सुचविल्याप्रमाणे मंत्रीमंडळाची मान्यता घेणे आवश्यक असल्यामुळे त्यानुषंगाने प्रस्ताव सादर करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मराठवाड्यात शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी होत नसल्याबाबत**

**(३४) ४८७३३ (१६-०५-२०१६). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाडा दुष्काळाच्या भीषण संकटात असल्याने ऊस, वीटभट्टी बांधकाम, चहाच्या टपऱ्या, हॉटेल घरकाम अशा सगळीकडे बालकामगारांचे प्रमाण आधीच्या तुलनेत यावर्षी १५ ते २० टक्क्यांनी अधिक असल्याचे सामाजिक संस्थांनी केलेल्या पाहणीत माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रत्येक मुल शाळेत जाईल एकही मुल घरी राहणार नाही असे शासनाचे धोरण असतांनाही मराठवाडयातील बहुतांश शाळांमध्ये शिक्षक हक्क कायदयाची अंमलबजावणी झाली नसल्याचे स्पष्ट होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्‌नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०८-२०१६) :**(१) व (२) नाही.
मराठवाडा विभागातील ८ जिल्ह्यांमध्ये दिनांक ०४ जुलै, २०१५ ते ३१ जानेवारी, २०१६ या कालावधीत वेळोवेळी केलेल्या सर्वेक्षणात १२,४५९ शाळाबाह्य मुले आढळून आली, त्या बालकांना नियमित शाळेत दाखल करण्याची कार्यवाही सुरु असून सर्व जिल्ह्यात शिक्षण हक्क कायदा २००९ ची अंमलबजावणी चालू आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील रोजंदारीवर कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याबाबत**

**(३५) ४८९३२ (२६-०५-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात १५ ते २० वर्षांपासून रोजंदारीवर साडे चार ते साडे पाच हजार रुपये मानधनावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्यात यावे व त्यांचे मानधन वाढविण्यात यावे इत्यादी मागण्यांसाठी विद्यापीठातील १२३ विभागातील कर्मचारी व रोजंदारी कामगारांनी आंदोलने करुनही त्यांच्या मागण्या मान्य न झाल्याने त्यांनी दिनांक १२ जानेवारी, २०१६ रोजी बेमुदत आंदोलन सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्मचारी व रोजंदारी कामगारांना सेवेत कायम करण्याबाबत व पगारवाढ करण्याबाबतचा निर्णय कुलगुरुंनी यापूर्वी घेऊनही त्या अनुषंगाने कार्यवाही न होण्याचे कारणे काय आहे,
(३) असल्यास, शासनाने मराठवाडा विद्यापीठातील कर्मचाऱ्यांचे आंदोलन त्यांनी मागे घ्यावे यासाठी त्यांचे मागण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०९-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) राजर्षि शाहू महाराज रोजंदारी कामगार संघटनेच्या मागण्यांच्या अनुषंगाने यासंदर्भातील प्रकरण कामगार न्यायालयात न्यायप्रविष्ट असून कंत्राटदारामार्फत विद्यापीठात कार्यरत असलेल्या रोंजदारी कर्मचाऱ्यांसाठी देय भविष्यनिर्वाह निधीची रक्कम विद्यापीठाने भविष्यनिर्वाह निधी आयुक्तांच्या कार्यालयात भरणा केली असल्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद या विद्यापीठाने दि. ११.०१.२०१६ च्या पत्रान्वये कळविले. त्यानंतर संघटनेच्या वतीने सुरु करण्यात आलेले बेमुदत कामबंद व चक्री उपोषण मागे घेण्यात आले.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### जालना जिल्हयातील उच्च व माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविदयालयास अनुदान मिळण्याच्या तरतुदीबाबत

**(३६) ४८९८२ (२५-०५-२०१६). श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना जिल्हयातील उच्च व माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविदयालयाच्या विभाग तुकडया, वर्ग यांचे मुल्यांकन कामकाज पूर्ण करुन अनुदानास पात्र शाळा,कनिष्ठ महाविदयालयाची यादी जाहिर करावी व तद्नुसार अनुदानाची तरतुद करावी या मागणीबाबतचे निवेदन मा.मुख्यंमत्री व मा.शिक्षणमंत्री यांना महाराष्ट्र विना अनुदानित उच्च व माध्यमिक शाळा कृति समिती यांनी दिनांक १६ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-०९-२०१६) :**(१) होय.
(२) कनिष्ठ महाविद्यालयांचे मुल्यांकनाचे प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यावर पुढील कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठवाडयात हंगामी वसतिगृहांच्या शासन निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी होण्याबाबत**

**(३७) ४९१४० (२८-०४-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऊसतोड, वीटभट्टी, बांधकामे, दगडाच्या खाणी, शेती अशा विविध उद्योगात कामासाठी स्थलांतर कराव्या लागणाऱ्या मजुरांच्या मुलांच्या पोषणाची जबाबदारी घेणारी वसतिगृहे सुरु करण्याचे आदेश देणारा शासन निर्णय ऑक्टोंबर २०१५ मध्ये राज्य शासनाने जारी केला असून प्रत्येक विद्यार्थ्यांच्या खर्चासाठी ८,२०० रुपयांची तरतूद केली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर शासन निर्णयानुसार मराठवाडयातील बहुतांश गावात आजमितीपर्यंत हंगामी वसतिगृहे सुरु करण्यात आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि मराठवाडयात हंगामी वसतिगृहाच्या शासन निर्णयाची प्रभावी अंमलबाजवणी होणयाबाबत शासनाकडून आजतागयात कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे.

(५) नसल्यास, मराठवाडयातील बहुतांश गावांत हंगामी वसतिगृहे अद्याप सुरु न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०८-२०१६) :**(१) होय.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात शिक्षण समृध्दी योजना बंद केल्याने या योजनेअंतर्गत काम करणाऱ्या शिक्षक प्रेरकांवर आलेली उपासमारीची वेळ**

**(३८) ४९५७३ (२५-०५-२०१६). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षण विभागामार्फत राबविली जाणारी शिक्षण समृध्दी योजना बंद केल्याने या योजनेअंतर्गत काम करणाऱ्या शिक्षक प्रेरकांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना पुर्ववत सुरू करून शिक्षक प्रेरकांच्या मागण्या मान्य कराव्यात यासाठी माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यासुमारास मुंबईच्या आझाद मैदानावर उपोषण केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या शिक्षक प्रेरकांच्या मागण्यांबाबत व शिक्षण समृध्दी योजना सुरू करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१९-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही. समाजसेवेची आवड असणाऱ्या, स्वेच्छेने काम करु इच्छिणाऱ्या प्रेरकाने आपला नेहमीचा व्यवसाय करून समाजसेवेचे कार्य नि:स्वार्थी वृत्तीने व मोकळ्या वेळेत करणे अपेक्षित आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाशिम जिल्ह्यातील मालेगांव येथे शालेय पोषण आहार योजनेतर्गत अतिशय निकृष्ट दर्जाचे धान्य पुरविण्यात येत असल्याबाबत**

**(३९) ४९८९१ (१२-०५-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्ह्यातील मालेगांव येथे शालेय पोषण आहार योजनेतर्गत अतिशय निकृष्ट दर्जाचा तांदुळ व डाळ शाळांना पाठविण्यात येत असून लहान मुलांच्या आरोग्याशी या यंत्रणेकडून खेळ खेळला जात असल्याच्या तक्रारी असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पण झाले, त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०८-२०१६) :**(१) हे खरे नाही
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाशिम येथे महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद पुणेच्या वतीने घेण्यात आलेल्या टंकलेखन परिक्षेत एका बोगस परिक्षार्थ्याने तीन विद्यार्थ्यांच्या नांवावर परिक्षा दिल्याबाबत**

**(४०) ४९८९९ (२६-०५-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम येथे महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद पुणेच्या वतीने घेण्यात आलेल्या टंकलेखन परिक्षेत एका बोगस परिक्षार्थ्याने तीन विद्यार्थ्यांच्या नांवावर परिक्षा दिल्याचा गंभीर प्रकार माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय निष्पण झाले आहे व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०८-२०१६)** :(१) व (२) हे खरे नाही. परंतु अशा आशयाची बातमी वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली होती. वर्तमानपत्रातील बातमीच्या अनुषंगाने चौकशी केली असता चौकशी मध्ये सत्यता आढळली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयातील २९ शाळांमधील ४४ महिला कामगारांना**
**कामावरुन कमी करण्यात आल्याबाबत**

**(४१) ५०१४८ (१२-०५-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील २९ शाळांमधील ४४ महिला कामगारांना माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान कामावरुन कमी करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयाविरोधात दिनांक १२ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास या महिलांनी जिल्हा परिषदेसमोर बेमुदत उपोषण सुरु केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या महिला कामगारांना शासनाच्या दिनांक १० जुलै, २०१४ च्या अध्यादेशाप्रमाणे कामावर घेण्यात यावे, असे निर्देश जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी यांनी संबंधित मुख्याध्यापकांना दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) उक्त प्रकरणी संबंधित मुख्याध्यापकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०८-२०१६)** :(१) शालेय पोषण आहार योजनेमध्ये स्वयंपाकी तथा मदतनीस म्हणून काम करणाऱ्या १० शाळांमधील १८ महिलांना शैक्षणिक वर्ष २०१४-१५ च्या सुरुवातीला कामावरुन काढून टाकण्यात आले होते.

(२) व (३) हे खरे आहे.

(४) शाळा व्यवस्थापन समितीला शालेय पोषण आहार योजनेंतर्गत बचत गटाची निवड करण्याचे अधिकार आहेत. यानुसार १० पैकी ५ शाळांच्या शाळा व्यवस्थापन समितीनी स्वयंपाकी / मदतनीस यांना पूर्ववत कामावर रुजू करुन घेतले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भंडारा जिल्हयातील अत्री येथील शाळेची अद्ययावत माहिती यू-डायसवर नसल्याबाबत**

**(४२) ५०३८२ (१२-०५-२०१६). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व शाळांची माहिती तात्काळ उपलब्ध व्हावी यासाठी शाळा, विद्यार्थी व शिक्षकांची माहिती यू-डायसमध्ये नोंदविली जात आहे मात्र शिक्षण विभागाच्या अधिका-यांना भंडारा जिल्हयातील अत्री येथील शाळेची अद्ययावत माहिती यू-डायसवर नसल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे सदर शाळा सोयी सुविधापासून वंचित राहत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०८-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात शालेय शिक्षण विभागाचे बोगस शासन निर्णय सोशल मिडीया साईटवर परसविण्यात येत असल्याबाबत

**(४३) ५०४०२ (२५-०५-२०१६). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील माध्यमिक व प्राथमिक शाळेतील शिक्षक व शाळेत शिक्षण घेणारे विद्यार्थी यांच्या सेवा व सुविधा विषयी अनेक प्रकारचे बोगस शासन निर्णय सोशल मिडीयाच्या साईटवर पसरविण्यात येत असल्याची घटना माहे डिसेंबर, २०१५ च्या प्रथम आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणात शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (१९-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पाठयपुस्तक मंडळाची पुस्तके राज्यापेक्षा राज्याबाहेरुन छापुन घेण्यात येत असल्याबाबत..

**(४४) ५११८७ (२५-०५-२०१६). ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाठयपुस्तक मंडळाची पुस्तके राज्यापेक्षा राज्याबाहेरुन छापुन घेण्यात येत असल्याची बाब माहे सप्टेंबर २०१५ मध्ये निदर्शनास आल्याने मुंबई मुद्रक संघाने मा. शिक्षण मंत्री यांच्यासोबत बैठक घेऊन ७५ टक्के काम राज्यातील छपाई व्यावसायिकांना देण्याचे आश्वासन मिळविले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गतवर्षी १५९ मुद्रकांपैकी ९५ मुद्रक हे राज्यातील होते, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, पाठयपुस्तक छपाईचे काम राज्यातील मुद्रकांना मिळण्याबाबत शासन कोणती उपाययोजना करणार आहे वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०८-२०१६) :**(१), (२) व (३) पाठ्यपुस्तक मंडळाच्या नियामक मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार शालेय वर्ष २०१६-१७ साठी पाठ्यपुस्तकांच्या छपाई कामाकरिता ई-निविदेद्वारे प्राप्त झालेल्या व मंडळाने निश्चित केलेल्या दरांस सहमती दर्शविणारे व छपाई बांधणीचे काम करणारे जे मुद्रक सर्व प्रकारच्या गुणवत्तेचे निकष पाळून छपाई-बांधणीचे काम वेळेत पूर्ण करण्याची हमी देतील, अशा स्थनिक मुद्रकांना पाठ्यपुस्तकांच्या ८०% छपाई-बांधणीचे काम सोपविण्याचा निर्णय झाला आहे.

शालेय वर्ष सन २०१५-१६ मध्ये पात्र ठरलेल्या एकूण १५९ मुद्रकांपैकी १४४ मुद्रकांनी पाठ्यपुस्तकांच्या छपाईची कामे केली असून त्यापैकी ९२ मुद्रक हे महाराष्ट्रातील व ५२ मुद्रक हे राज्याबाहेरील होते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लातूर जिल्हयातील शाळेतील विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन योजनेत तुरडाळ पुरवठा होत नसल्याबाबत

**(४५) ५११९३ (२५-०५-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयात जिल्हा परिषद व खासगी संस्थेतील शाळेतील विद्यार्थ्यांना माहे सप्टेंबर, २०१५ पासून मध्यान्ह भोजनाकरिता तूरडाळ पुरवठा होत नसल्याबाबत व निकृष्ट दर्जाचा धान्याचा पुरवठा होत असल्यामुळे विद्यार्थ्यांचे आरोग्यावर परिणाम होत असल्याबाबतची माहिती दिनांक ११ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय. चौकशीत काय आढळून आले तद्नुसार संबंधित दोषीविरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०८-२०१६) :**१) व २) दि २-२-२०११ च्या शासन निर्णयानुसार संबंधित जिल्हयाच्या आवश्यकतेप्रमाणे योग्य त्या पाककृतीची निवड आठवड्यातील प्रत्येक दिवसासाठी करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखालील समितीस देण्यात आलेले आहेत. यानुसार जिल्हा स्तरावर पाककृती निश्चीत करणत येते. यानुसार जिल्हास्तरावररून तुरडाळीऐवजी मुगडाळीची मागणी करण्यात आली होती.

लातूर जिल्हयामधील काही शाळांमध्ये मसूरडाळ निकृष्ट दर्जाची पूरविली असल्याचे आढळून आले होते. सदर मसूरडाळ तात्काळ बदलून घेतली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती येथील श्री चक्रधर स्वामी ग्रंथालय तथा साहित्य संशोधन संस्थेस जुन्या हस्तलिखित पोथांच्या संरक्षण, संशोधन तथा प्रकाशनासाठी मिळणारे अनुदान वाढवून देण्याबाबत**

**(४६) ५२८३४ (२६-०५-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री. क्षेत्र अमरावती येथील श्री प्रभू प्रबोधन संस्था रिद्धपूर द्वारा चालविण्यात येणाऱ्या श्री चक्रधर स्वामी ग्रंथालय तथा साहित्य संशोधन संस्थेस जुन्या हस्तलिखित पोथ्यांचे संरक्षण, संशोधन तथा प्रकाशनासाठी मिळणारे अनुदान वार्षिक केवळ २५०० रु. असून ते किमान जिल्हा ग्रंथालयाचे समकक्ष वाढवून देण्याबाबत आणि श्री पु. चं. नागपुरे, सरचिटणीस, श्री प्रभू प्रबोधन संस्था रिद्धपूर यांनी दिनांक २१फेब्रुवारी,२०१६ रोजी वा मा.मुख्यमंत्री आणि मा.पालकमंत्री, अमरावती यांचेकडे लेखी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२७-०९-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) श्री.प्रभू प्रबोधन संस्था, श्री क्षेत्रा रिध्दपूर, जि.अमरावती या ग्रंथालयास शासनमान्यता नसल्यामुळे सदर ग्रंथालयास शासनाकडून परिरक्षण अनुदान देण्याची नियमात तरतूद नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मराठी भाषा विभागाची पुनर्रचना व मराठी विद्यापीठ स्थापणेबाबत**

**(४७) ५४३२० (२२-०८-२०१६). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजभाषेच्या विकासासाठी व दीर्घकालीन नियोजनासाठी मराठी भाषा विभागाची पुनर्रचना करण्याची राज्यातील लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी शासनाकडे मागणी केलेली आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठी अभ्यास केंद्राने राजभाषा मराठी विभागाच्या पुनर्रचनेसाठी पाठविलेला प्रस्ताव माहे एप्रिल २०१० पासून तब्बल दहा वेळा शासनास सादर करूनही अद्यापही तो शासनाच्या लाल फितीत अडकल्याचे निदर्शनास आले , हेही खरे आहे काय,

(३) तसेच मराठी विद्यापीठ स्थापनेचा प्रस्ताव अनेक वर्षापासून शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, मराठी भाषेचा लोकभाषा म्हणून विकास करण्यासाठी व मराठी भाषेची प्रतिष्ठा उंचावण्यासाठी तसेच प्रश्न भाग (१), (२) व (३) बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०९-२०१६) :**(१) होय.
(२) नाही.

मराठी अभ्यास केंद्राच्या प्रस्तावावर शासन स्तरावर झालेल्या बैठकीमध्ये अभ्यास केंद्राच्या मागणीनुसार ६ नवीन उपविभागांसाठी अतिरीक्त मनुष्यबळ देणे सध्या शक्य नसल्याचे सुचित करण्यात आले. तथापी मराठी अभ्यास केंद्राने केलेल्या काही सूचनांचा प्रस्तावित मराठी भाषा धोरणामध्ये समावेश करण्यात आला आहे.

(३) मराठी भाषा विद्यापीठ स्थापन करण्यासंदर्भात अभ्यास करून राज्य शासनास शिफारशी सादर करण्यासाठी एक समिती गठीत करण्याची उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून कार्यवाही सुरू आहे.

(४) राज्यसभा अधिनियम १९६४ च्या अनुषंगाने शासन व्यवहारात मराठी भाषा विभागांतर्गत भाषा संचालनालय, महाराष्ट राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, महाराष्ट राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ व राज्य मराठी विकास संस्था यांचेद्वारे विविध उपक्रम सुरु आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कल्याण पश्चिम येथील गांधारी येथे मुंबई विद्यापीठाच्या कल्याण उपकेंद्राचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(४८) ५८४७९ (२२-०८-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण पश्चिम येथील गांधारी येथे मुंबई विद्यापीठाच्या कल्याण उपकेंद्राचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे होत असून बांधकाम पूर्ण होण्यापूर्वी प्लास्टर पडत असल्याने, चौकशी करण्याची मागणी स्टुडंट ॲक्शन फ्रंट या विद्यार्थी संघटनेने मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु यांच्याकडे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त निकृष्ट बांधकाम करणाऱ्या कंत्राटदारांची चौकशी करुन कारवाई करण्याबाबतची मागणी विद्यार्थी संघटनेने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने संबंधित कंत्राटदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१७-१०-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे. स्टुडंट ॲक्शन फ्रंटचे श्री.प्रशांत इंगळे यांनी दिनांक २५ मे, २०१६ रोजी कुलसचिव यांची भेट घेऊन याबाबत तक्रार केली आहे.

(२) होय, हे खरे आहे. स्टुडंट ॲक्शन फ्रंटचे श्री.प्रशांत इंगळे यांनी कुलसचिवाची भेट घेऊन काम निकृष्ट असल्याची लेखी तक्रार केली आहे.

(३) याबाबत विद्यापीठाने चौकशी केली आहे. मार्च २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात कल्याण उपकेंद्राच्या आग्नेय दिशेकडील बांधकामास ट्रक मागे घेताना धक्का बसल्याने तडा गेला व

त्याचे प्लास्टर देखील पडले होते. सदर बांधकाम दर्शनी भागाचे सुशोभीकरणाचे बांधकाम होते. तथापि, लगेच तडा गेलेले बांधकाम तोडून नव्याने करण्यात आले आहे व त्याला प्लास्टरही करण्यात आले आहे. कामाच्या दर्जाची तपासणी वेळोवेळी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सलटन्सीकडून होत असते व त्या कामासाठी वापरण्यात येणाऱ्या घटकांची व क्रॉन्क्रीट क्युबची तपासणी वेळोवेळी करण्यात आली असून तपासणीत कुठेही निकृष्ट दर्जाचे असल्याचे आढळले नाही. सदर घटना अपघात असल्याने बांधकाम निकृष्ट दर्जाचे आहे असे म्हणता येत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात नवा विद्‌यापीठ कायदा येणार असल्याने राज्यातील सर्वच विद्‌यापीठांच्या प्राधिकरणांच्या निवडणूका स्थगित केल्याबाबत**

**(४९) ५८८६६ (२२-०८-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नवा विद्‌यापीठ कायदा येणार असल्याने राज्यातील सर्वच विद्‌यापीठांच्या प्राधिकरणांच्या निवडणूका स्थगित केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निवडणूका स्थगित केल्यामुळे अभ्यासक्रम तयार करणाऱ्या अभ्यास मंडळाच्या नेमणूका झाल्या नसल्याने, अभ्यास मंडळाची प्रक्रिया प्रलंबित राहिली असून, माहे मे, २०१६ संपूनही अनेक विषयांचे अभ्यासक्रम तयार झालेले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विद्‌यापीठात अभ्यासक्रम नसल्याने विद्‌यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार असून, सन. २०१४-१५ मध्ये प्रवेशित झालेल्या बीकॉम- फायनान्शिअल मॅनेजमेंट, ट्रान्सपोर्ट मॅनेजमेंट, बीएमएस, बीएस्सी मायक्रोबायोलॉजी आदी सात-आठ विषयाच्या विद्‌यार्थ्यांचे सर्वाधिक नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या संदर्भात शासनाने तातडीने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहे तसेच याबाबतची सद्‌यःस्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०९-२०१६) :**(१) होय.
(२) व (३) नाही, याबाबत महाराष्ट्र विद्‌यापीठ कायदा १९९४, मधील तरतुदीनुसार मा. कुलगुरु यांना असलेल्या अधिकारानुसार कुलगुरु हे अभ्यासक्रम तयार करणाऱ्या मंडळाची पर्यायी व्यवस्था करू शकतात. त्यामुळे कोणत्याही विद्‌यापीठात अशा प्रकारे अभ्यासक्रम तयार नसल्यामुळे कोणत्याही विद्‌यार्थ्यांचे नुकसान होणार नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शासकीय तंत्र निकेतन, हेडंज, मुर्तिजापूर (जि.अकोला) या संस्थेत स्थापत्य अभियांत्रिकी अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत**

**(५०) ६१९७३ (२२-०८-२०१६). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय तंत्र निकेतन, हेडंज, मुर्तिजापूर (जि.अकोला) या संस्थेत स्थापत्य अभियांत्रिकी अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (मुर्तिजापूर) यांनी दिनांक १६ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांना निवेदन देऊन मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीनुसार सदरहू संस्थेत स्थापत्य अभियांत्रिकी अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१७-१०-२०१६) :**(१) अशा प्रकारचे कोणतेही निवेदन शासनास प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२) अशा प्रकारची कोणतीही बाब सध्या शासनाचे विचाराधीन नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.